
# जय गिरिनारी



अनुप साळगांवकर

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# जय गिरिनारी

## लेखक : अनुप अनिल साळगांवकर

# जय गिरिनारी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# जय गिरिनारी

अनुप अनिल साळगांवकर

मोबाईल :९८६९४०४९५३

wataspp ७७१८९६८९५३

ई मेल : salgaonkar.anup@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ११ डिसेंबर २०१९ (दत्तजयंती)

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत



शब्द ब्रम्ह आहेत. हे विश्वच ध्वनिनिर्मित शब्दांचं आहे. जिथे शब्द संवाद साधतात, शब्द हास्य खुलवतात, शब्द  गालावर ओघळतात, शब्द व्यक्त होतात, शब्द ठाव घेतात, शब्द चित्र रंगवतात, शब्द निःशब्द होतात.

महाविद्यालयात शिकत असताना एकदा ओघानं "मृत्यूंजय" हे पुस्तक हातात पडलं. अगदी तेव्हापासूनच वाचनाची आवड निर्माण झाली. या पुस्तकांच्या विश्वात मन रमू लागलं. वाचता वाचता लिहावंसं वाटलं. जेव्हा आपल्याला काहीतरी लिहावंसं वाटतं तेव्हा एका लेखकाचा जन्म होतो. माझ्यातल्या लेखकाचाही जन्म असाच झालाय. लिहायची सुरवात साधारण २०१५ साली झाली. महाराष्ट्र टाइम्स, मुंबईच्या वर्तमान पत्रात "सांगा ना गोष्ट" या सदरात बालसाहित्यावर पहिली गोष्ट छापून आली, फार आनंद झाला. खूप छान प्रतिक्रिया मिळाल्या.

आपण काहीतरी लिहिणं आणि वाचकांना ते आवडणं या पेक्षा सुख वेगळं ते काय ?

घरच्यांकडून, थोरा -मोठ्यांकडून, मित्र -मत्रिणींकडून खूप कौतुक झालं. लिहिण्याची प्रेरणा ही याच साऱ्यांनी दिली. एक गोष्ट लिहायला घेतली त्या एका गोष्टीच्या पंधरा गोष्टी कधी लिहून झाल्या माझं मलाच कळलं नाही. त्या पुस्तक रूपात सर्वपरिचित व्हाव्यात हि मनोमन इच्छा होतीच. ई साहित्य प्रतिष्ठान यांनी माझ्यावर विश्वास दाखवून बालसाहित्यावर "बाळबोध" हे माझं पाहिलं पुस्तक प्रकाशित केलं. त्यांनी दिलेल्या प्रेरणेबद्दल, माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी या संपूर्ण  ई साहित्य कुटुंबाचा अत्यंत ऋणी आहे.

लिहिणे हा एक प्रवास आहे आणि तो माझ्याकडून असाच अविरत चालू राहील. या प्रवासात आपल्या प्रतिक्रिया मला मार्गदर्शक व प्रेरक ठराव्यात ही इच्छा.

अनुप साळगांवकर

मोबाईल :७७१८९६८९५३/ ९८६९४०४९५३

ई मेल : salgaonkar.anup@gmail.com

अर्पण पत्रिका - श्री स्वामी समर्थ चरणाविंदार्पणमस्तु

# गिरनार पवित्र डोंगर

" विश्वास " हा आंतरमनाचा पाय आहे. शब्द जितका सोपा आहे, अनुभव घ्यायला तितकाच कठीण. याच विश्वासावर आपण अशक्यही शक्य करू शकतो. आजकाल देवावरचा आणि स्वतःवरचा विश्वास कुठेतरी कमी झाला आहे असे जाणवते. देव हा दगडात नसून ती एक अदृश्य मंगल शक्ती आहे, उर्जा आहे. आपल्या भारतात अशी अनेक ठिकाणे आहेत की जिथे ईश्वरी शक्तींचा स्तोत आहे. या शक्तीचा म्हणजेच दिव्यत्वाचा प्रत्यक्ष प्रत्यय या अशा ठिकाणी जाऊनच घेता येतो. मन हे निसर्गतः चंचल आहे. ते एकाचवेळी दश दिशा फिरत असते. वयाच्या कोणत्याही टप्प्यावर ते कधीही स्थिर होत नाही. ते स्थिर झालं तरच स्वतःचा शोध घेता येतो. आपल्याला आपल्या आंतरमनाचा आवाज ऐकू येतो. आपल्या चांगल्या विचारांचं वर्तुळ आपल्या आयुष्यात चांगल्या गोष्टी, घटना आणि माणसं सतत आकर्षित करत असतं.

आपला महाराष्ट्र हा आपण संतांची भूमी म्हणून ओळखतो. याच महाराष्ट्रात अशी अनेक ठिकाणे, मंदिरे आणि तीर्थ स्थळे आहेत जिथे एक अनामिक ऊर्जा भरून राहिली आहे, तिथे वास्तव्य करणाऱ्या महात्मा पुरुषांनी त्यांच्या तपोबलाने ते स्थान सिद्ध केले आहे. त्या स्थानाच्या दर्शनाने, यात्रेने मन स्थिर होते. आपल्याला खूप सकारात्मक ऊर्जा मिळते. हे पुस्तक म्हणजे मी माझ्या मनाला स्थिर आणि शांत करण्यासाठी प्रयत्नपूर्वक केलेल्या एका धार्मिक यात्रेचा अनुभव आहे. हा फक्त अनुभव

नाही तर हा स्वतःहून घेतलेला स्वा-नुभव आहे. जो प्रसाद म्हणून तुम्हा साऱ्यासोबत वाटताना मला आत्यंतिक समाधान लाभले आहे.

नवी पिढी हि अनुकरणाने घडत असते. ती घडवण्याची जबाबदारी हि आपल्या साऱ्यांची आहे. सध्या तरुणांनी या धार्मिक आणि आध्यात्मिक मार्गाकडे वळावे, जेणेकरून मन प्रसन्न राहील, जगात विश्वशांती प्रस्थापित होईल, स्वतःचा तसेच स्वतः सोबत इतरांचाही ऊत्कर्ष करता येईल. हे पुस्तक तुमच्या मनात नक्कीच धार्मिक स्थळांबद्दल ओढ निर्माण करेल. हे पुस्तक वाचून जर तुम्ही गिरनार स्थानाला एकदा भेट देण्याचा विचार केलात, तर ते यश नक्कीच या पुस्तकाचे असेल.

शुभं भवतु, कल्याणमस्तु

**गिरनार पवित्र डोंगर**



गुरु ब्रम्हा गुरु विष्णू गुरुः देवो महेश्वरा

गुरु शाक्षात परब्रम्हा तस्मै श्री गुरुवे नमः

श्री. गुरु दत्तात्रेयांनी जिथे प्रत्यक्ष निवास केला आहे असे ठिकाण पर्वतशिखरांचा समूह म्हणजे श्री क्षेत्र गिरनार !

स्थान: गिरनार पर्वत, तलेठी, जुनागड जिल्हा सौराष्ट्र (गुजराथ राज्य)



श्री दत्तमहाराजांचे अक्षय निवास स्थान म्हणून गिरनारची ख्याती आहे. श्री स्वामी समर्थ मठ, दादर, मुंबई येथे साधारण २-३ वर्षांपूर्वी गिरनार यात्रा अनुभव या विषयावर एक व्याख्यान होते. ते ऐकण्याचा योग जुळून आला. सादर करणारे गृहस्थ गिरनारला १०८ वेळा जाऊन आले होते. अतिशय सुंदर आणि उत्कंटावर्धक अनुभव कथन ऐकून मनात एकदातरी गिरनारला जाऊन यावे असे वाटले. तात्काळ स्वामींना विनंती केली, पण माझी इच्छा उत्कट असण्यापेक्षा दत्त प्रभूंची इच्छा असेल तर बोलावणे येते असे कळले. मी इच्छा प्रकट करून ती पूर्ण करून घेण्याचा भार स्वामींवर टाकला आणि निश्चिंत झालो. मी प्रयत्नपूर्वक खूप टूर आणि ट्रॅव्हल शोधले. सध्या नावाजलेले कोणतेही टूर आणि ट्रॅव्हल तेथे जात नाहीत. या यात्रेत शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही शक्ती पणाला लागतात. प्रवाशांच्या बाबतीत कोणताही धोका या खाजगी नावाजलेल्या कंपन्या पत्करत नाहीत. माझ्या बाबतीत गिरनार यात्रेचा योग हा ऑक्टोबर २०१९ मध्ये जुळून आला. ११ ते १४ ऑक्टोबर या कालावधीत हि धार्मिक आणि अध्यात्मिक यात्रा ईश्वरी कृपेने आणि स्वामींच्या आशिर्वादाने घडून आली. ईझी टूर हि एक ट्रॅव्हल कंपनी आहे, पुण्याची आहे, ती हे काम सेवाभाव म्हणून माफक दारात करते. मी फोन करून थोडी चौकशी केली आणि तत्पर नोदंणी केली. आठवड्याभरातच यात्रा होती हि कोजागिरी पौणिमा निमित्त आयोजित यात्रा होती. माझे तिकीट त्यांनी मला मोबाईल वर पाठवले.

तिकिटात माझ्या सोबत अजून तीन नावे होती, श्री. करंबळे, श्री. मोरे आणि श्री. जोर्वेकर. ही तीन नावे पाहूनच आनंद झाला. प्रवासात सोबत म्हणून ब्रम्हा विष्णू आणि महेश असे हे तिघे दत्तप्रभू सोबतीला आहेत म्हटल्यावर यात्रा निर्विघ्न होणार याची खात्री पटली. त्यांचीही हि पहिलीच गिरनार यात्रा होती. पश्चिम

भारतातील गुजरात राज्यामध्ये जुनागड या शहरापासून गिरनार तळ ५ कि. मी. अंतरावर आहे. या पर्वताचा विस्तार सुमारे ४ योजनं म्हणजेच १६ गावांपर्यंत आहे. सुमारे २८ चौ. कि. मी.एवढा व्याप्त आहे. मुंबईहुन ११ ऑक्टोबरला निघून आम्ही कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी १२ ऑक्टोबर २०१९ ला दुपारी गिरनारला (भवनाथ- तलेठी ) येथे पायथ्याशी असलेल्या हॉटेल मध्ये उतरलो. हॉटेलचे नावही यात्रेला साजेसेच होते " मंगलम", म्हणजेच सगळं मंगल होणार आहे याची दत्तप्रभूंनी वर्दीच दिली होती. सगळीकडेच गुजराती पाट्या, काही इंग्रजीतही होत्या त्यामुळे सोईचे झाले. गुजराती भाषा समजून घेणे तसे फार कठीण नाही बघा. गुजरात मधले रस्ते बाकी खूप छान आहेत मोठे, लांबसडक आणि मुख्य म्हणजे खड्डे विरहित. तलेठी गावात पोहोचलं आणि पायथ्यपासूनच वर पाहीलं कि गिरनार पर्वत सुंदर दिसतो. दुपारचे ऊन असल्यामुळे उन्हात किरणांनी न्हाऊन निघतो. नुकताच परतीचा पाऊस झेलून हिरवागार. अर्ध्या पेक्षा जास्त उंचीवर छोटे देवळाचे कळस दिसतात. तिथे साधारण नेमिनाथ भगवान हे जैन तिर्थ मंदिर आहे. उंच डोंगराच्या माथ्यावर एक लालसर नारींगी रंगाचे मंदिर दिसते ते श्री अंबाजी मातेचे मंदिर आहे.



गिरनार यात्रा हि तीन टप्यात विभागली गेली आहे. तीन टप्यांचे तीन वेगळे पर्वत आहे. पहिला पर्वत पूर्ण चढून गेल्यावर दुसरा पर्वत दिसतो जो सर्वात उंच आहे आणि मग दुसऱ्यावरून तिसरा दिसतो. तलेठी गावातून पहिले असता फक्त एकाच पहिला पर्वत दिसतो ज्या पर्वताआड इतर दोन्ही पर्वत झाकून जातात. पहिला टप्पा (पहिला

पर्वत) राजा भर्तृहरी आणि गोपीचंद गुंफा, जैन देरासर मंदिर, अंबाजी माता मंदिर. दुसरा टप्पा (दुसरा पर्वत) गुरु गोरखनाथ मंदिर आणि धुनी. तिसरा टप्पा (तिसरा पर्वत) श्री. गुरु शिखर (दत्त पादुका), कमंडलू कुंड. या यात्रेकरिता एकूणच १०,००० पायऱ्या आहेत.

१०,००० पायऱ्या चढुन जाणं हे शारीरिक व मानसिक क्षमतेची कसोटी पाहणार असलं तरी दत्तभक्तांनी एकदा तरी जायलाच पाहिजे असं हे रमणीय स्थान आहे, याची प्रचिती तिथे गेल्यावर येतेच. वातावरणात दत्त नामाचा महीमा भरून राहीला आहे, तोच आपल्याला भारुन टाकतो. पायथ्यापासून वर पर्वतावर पहिले कि आंबा मातेचे मंदिर आपल्याला खुणावत राहते. दत्त चरणाची अनामिक ओढ लागते. मुखी श्री दत्तनाम नाचू लागते आणि मन हळू हळू स्थिर होत जाते. भगवान दत्तात्रयांनी आपल्या चिरंतन वास्तव्याने पुनीत केलेले आणि बारा हजार वर्षे तपाने सिध्द केलेले स्थान म्हणजेच पूर्व इतिहासात गिरनार हा पर्वत अशी येथे दत्तभक्तांची अनन्य श्रध्दा आहे. भौगोलिक दृष्ट्या असंख्य छोट्या मोठ्या पर्वतांचा, शिखरांचा आणि सुळके यांचा एकूणच समूह असलेला हा परिसर आहे. हवेत थोडा गारवा जाणवतो, संपूर्ण वातावरण आल्हाददायी आहे. शिवपुराणात गिरनारचा उल्लेख रेवताचल पर्वत म्हणून करण्यात आला आहे. "रेवताचल" यात "चल" म्हणजे पूर्वी हे सगळे पर्वत हवेत उडायचे असे आम्हांला सांगण्यात आले. स्कंद पुराणात रैवत, रेवताचल, कुमुद, उज्जयंत अशी गिरनारची नावे आढळतात. रेवताचल, कुमुद, उज्जयंत हि नावे त्रैमुर्ती (ब्रह्मा, विष्णू, शंकर) यांच्याशी निगडीत आहेत.



श्रीरामाचे तसेच पांडवांचे वास्तव्य या पर्वतावर झाल्याचे दाखले पुराणांत मिळतात. त्यांचीही छोटी छोटी मंदिरेही पर्वतावर आहेत. पुराणांमध्ये याचा श्वेताचल, श्वेतगिरी अशा नावाने उल्लेख आढळतो, तसेच गिरनार हा हिमालयापेक्षाही प्राचीन असल्याचा संदर्भही मिळतो. वरील सर्व गोष्टी गिरनारच्या दिव्यत्वाशी निगडीत आहेत. गिरनार पर्वताचा हा परिसर अत्यंत निसर्गरम्य, विलोभनीय, वन्यप्राणी, जीव- जगताने संपन्न तसेच विविध औषधी वनस्पतीने युक्त असा आहे. कित्येक संतांना याच ठिकाणी दत्तप्रभूंनी साक्षात् दर्शन दिले आहे. अनादीकालापासून कित्येक सिद्धयोगी गिरनारच्या गुंफामध्ये साधना करत आहेत.

बाबा किनाराम अघोरी, श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराज, रघुनाथ निरंजन, नारायण महाराज, यांसारख्या संताना इथे दत्त महाराजांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ झाला आहे. ही भूमी योगी सिध्द महात्मे यांनी संपन्न केली आहे. म्हणूनच आजही अनेक जण गिरनार पर्वतावर त्यांच्या स्थानावर तपश्चर्येला बसलेले आढळून येतात. गिरनार पर्वताच्या पायथ्याला म्हणजेच तलेठीला भवनाथ मंदिर, भगवान महादेव मंदिर, मृगी कुंड, लंबे हनुमान मंदिर अशी प्राचीन प्रेक्षणीय स्थळे आहेत. असा हा श्री गिरनार पर्वत तेजोमय भगवान श्रीदत्तप्रभू यांचे हे अक्षय निवासस्थान आहे.

आमच्या मंगलम हॉटेल शेजारीच हे महादेवाचे भवनाथ मंदिर आहे. महाशिवरात्रीला येथे पाच दिवसांची जत्रा भरते. तेथे मृगी कुंड आहे. शिवरात्रीच्या मेळयाला या कुंडाजवळ भगवान महादेव मंदिरच्या दर्शनाला १० ते १२ लाख लोक जमा होतात. मृगी कुंडातील सिध्दांचे स्नान हे यातील प्रमुख आकर्षण असते. अशी एक आख्यायिका आहे कि, स्वयं शिव महाशिवरात्रीला या कुंडात स्नानासाठी येतात. मृगी कुंडामध्ये हे नागा साधू स्नानाला जेंव्हा उतरतात, त्या साधूंमध्ये असा एक साधू असतो, की जो मृगी कुंडात डुबकी मारल्यावर बाहेर येत नाही, अंतर्धान पावतो. तोच स्वयं शिव असतो अशी मान्यता आहे. मी थोडा आराम करून सायंकाळी ६ च्या सुमारास तिथे जाऊन शिवमंदिर दर्शन घेऊन आलो. सोनेरी रंगाचे खांब आणि कमान असलेले हे मंदिर असून साधारण दोन अडीच फुटाचे शिवलिंग आहे. लिंगावर चंदनाने त्रिपुंड, डोळे आणि फुलांचा शुंगार केलेला असतो.

मंदिर शेजारीच हे मृगी कुंड आहे त्यात मासे विहार करीत होते. त्या माशांना खाऊ घालण्याचा मोह मला झाला पण बाजूलाच गुजरातीत लिहिलेली पाटी नीट वाचली आणि स्वतःला थोडा आवर घातला. रात्री नऊला पर्वतारोहणाला निघायचे म्हणून आता आराम करू असे ठरवून थोडा आराम केला. साधारण सात वाजले असतील. मी पायऱ्या चढू शकेन कि नाही ? व्यवस्थित दर्शन होईल कि नाही ? अशा अनेक प्रश्नांची  उत्तरे शोधता शोधता माझे पाय अचानक दुखायला लागले. तरीही मी मनाशी पक्के ठरवले होते काहीही झाले तरी दर्शन घेऊनच परतायचे. "श्री स्वामी समर्थ" नामाचा जप केला, पायाला थोडे तेल लावून मसाज केला. थोडे बरे वाटले.

रात्री आठला सगळी तयारी करून जेवायला खाली उतरलो. चालताना प्रवासात काही त्रास होऊ नये म्हणून हॉटेल मध्ये गरम गरम मूगडाळीची खिचडी आणि ताकाची कढी असा साधा बेत होता, तोच प्रसाद मानून घेतला. अशा धार्मिक यात्रेत जे काही जेवायला मिळेल ते " अन्न हे पूर्णब्रह्म " मानून प्रसाद म्हणून ग्रहण करावे. एकूणच गिरनार च्या पायथ्याला असलेले तलेठी हे एक साधं गाव आहे, जुनागड शहरापासून थोडं दूर आहे. गिरनार पर्वतामुळे या गावाला ओळख मिळाली आहे, तसेच काहीशी हॉटेल्स, चहा -पाण्याची टपरी, छोटी दुकाने, रिक्षा स्टँड अशी छोटी मोठी उपजीविकेचे साधने उपलब्ध झाली आहेत. आमच्या मंगलम हॉटेल पासून पर्वताच्या पायथ्याची कमान फक्त तीन मिनिटावर होती. बरोबर रात्री नऊ च्या सुमारास आम्ही चालायला सुरवात केली.

गिरनार चढण्यासाठी काठीची गरज असते, चढताना तोच एक भक्कम आधार असतो म्हणून मी एक दुकानातून ३०/- रु काठी घेतली. हि काठी परत आणून दिली कि २०/- रु. परत देतात. पहिल्याच पायरीवर डोकं टेकून दत्त महाराजांना शरण जा. निश्चिंत व्हा. महाराज सुखरूप नेऊन आणतील असं सांगण्यात आलं. आम्ही पहिल्या पायरीपाशी पोहचलो. डावीकडे हनुमान मंदिर आहे. अनायसे शनिवारच होता, मारुती रायांनी दर्शन दिले सुखावून गेलो. त्यांना हात जोडून नमस्कार केला, "शक्ती द्या" म्हणून मनोभावे सांगितले.



मी पहिल्या पायरीला डोकं टेकून नाक घासून नमस्कार केला. महाराजांना आता तुम्हीच आहात, माझी यात्रा सफल संपूर्ण करा अशी प्रार्थना केली. उजवा पाय पुढं टाकून गिरनार चढायला सुरवात केली. घड्याळी रात्रीचे ९. १५ वाजले होते. डावीकडे खूप छोटी छोटी काली मातेची, शंकराची मंदिरे आहे, त्यांची दर्शने आणि

आशीर्वाद घेऊन आम्ही पुढे चालत राहिलो. सुरवातीला दोन दोन पायऱ्या आहेत. त्या पुढे तीन चार होत जातात. हळू हळू चढू, घाई करायची नाही असे आम्ही ठरवले होते. सुमारे २०० पायऱ्यावर डावीकडे श्रीभैरवाच्या मुर्तीचे दर्शन होते. पौर्णिमेला मंदिर रात्रभर उघडे असते आणि कोजागिरीला तर येथे फार गर्दी असते. दर्शनासाठी उत्सुख भाविकांची संख्या फार असते. याचा प्रत्यक्ष प्रत्यय आम्हालाही आला. पायऱ्यांवर फारच भाविक दिसले साधारण दीड दोन हजार माणसे असतील. सगळे आपापल्या परीने गुरु शिखर चढण्याचा प्रयत्न करत होते. या भाविकांमध्ये महाराष्ट्रीयन भक्तांची संख्या फारच होती. काही लहान मुलेही होती. वयोवृद्धांसाठी डोलीचीही सोय आहे. डोलीवाले माणसाच्या वजनानुसार साधारण ८,००० /- ते १०,०००/- घेतात.



काही अंतर म्हणजेच एक ४००-५०० पायऱ्या झाल्या कि बसणासाठी चौथऱ्याची उत्तम सोय आहे. थोड्या थोड्या अंतरावर लाईट चे खांब आहेत, उजेड फार पडत नाही. जो काही प्रकाश आहे तो चढण्यासाठी आणि पायऱ्या दिसण्यासाठी पुरेसा आहे. पर्वत चढताना वा उतरताना कुणी सहयात्रेकरू भेटला, दिसला तर "जय

गिरनारी " म्हणून जयघोष करण्याची प्रथा आहे. या जयघोषांद्वारे दिलेल्या शुभेच्छा सोमोरच्या व्यक्तीचा आणि आपलाही प्रवास सुकर करतात. या जयघोषाने कदाचित गिरनार पर्वतही सुखावत असेल. मी ही येता जाता सगळयांना "जय गिरीनारी, जय गिरीनारी" म्हणून जयघोष करत होतो.

मी प्रत्येक पायरीवर पाऊल ठेवताना " श्री स्वामी समर्थ " असे नामःस्मरण करायचे असे ठरवून पायऱ्या गाठत होतो. कोजागिरी पौर्णिमेचा चंद्राचा प्रकाश प्रत्येक पायरी उजळवत होता आणि आभाळी चांदण्यांनीही फेर धरला होता. सगळीकडेच "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" असा मंत्रजप चालू होता. काही यात्रेकरू मोबाईलवर भजने, नामस्मरण लावून पायऱ्या चढत होते. एक दोन हजार पायऱ्यांपर्यंत लिंबू पाणी, गोळया, सोडा वॉटर ची दुकाने आहेत. पर्वताखाली मिळणारी पाण्याची बाटली २०/-रु. तर तीच पर्वतावर ४०/- रु. आहे. खरतर पाण्याच्या बाटल्या एवढ्या वर आणून विकणे हीच मोठी कसरत आहे. पण एक दोन अडीच हजार पायऱ्या चढून गेलात कि आपल्याला तहान भूक काही लागत नाही. हवाही एवढी थंड असते कि शरीर हळू हळू हलके होत जाते. मनाचा गाभारा दत्त नामस्मरणाने भरुन जातो. गिरनार पर्वतालाही कदाचित नामसाधनेचा आनंद होतो आणि तो आपला भार सहजपणे उचलतो.

जुनागढ रेल्वे स्टेशन पासून गिरनार पायथ्याशी येताना एका सह प्रवाशानी गिरनारची जी एक रंजक कथा सांगितली. ती अशी कि, गिरनार हा पार्वतीचा मातेचा भाऊ. भगवान शंकरावर रुसून पार्वती आपल्या भावाकडे राहायला आली आणि तिने

गिरनारवर आपले वास्तव्य केले. भगवान शंकराने पर्वतीवर लक्ष ठेवण्यासाठी दत्त प्रभुना गिरनारवर पाठवले. पार्वतीने दत्तांना तुम्ही माझ्यावर लक्ष ठेवा पण माझ्या नजरेस पडायचे नाही असे सांगितले. पार्वती माता इकडे आंबा माता म्हणून पुजली जाते ५१ शक्तिपीठांपैकी हेही एक शक्तिपीठ आहे. देवी पार्वतीने अंबामातेच्या रूपात गिरनार पर्वतावर वास केला. हे मंदिर पुरातन असल्याचे सांगितले जाते.



मातेच्या विरुद्ध दत्तात्रयांचे मंदिर आहे. दत्तात्रयांच्या सेवेसाठी नाथ संप्रदायातले गोरक्षनाथ गिरनारी आले. त्यांनी दत्ताची खूप मनोभावे पूजा केली. त्या पूजेची फलश्रुती म्हणून गोरक्षनाथांनी महाराजांकडे प्रार्थना केली होती की "आपले चरण दर्शन मला सतत व्हावे" साधारणपणे गुरूचे स्थान उंचीवर असते.

दत्तमहाराजांनी भक्ताची प्रार्थना मान्य केली. यामुळे गोरक्षशिखर उंचावर आहे. नवनाथ संप्रदायातील श्री गोरक्षनाथांनी याच ठिकाणी घोर तपश्चर्या केली. त्यांना प्रत्यक्ष दत्तमहाराजांनी दर्शन देऊन कृपांकित केले आहे. आणि आजही गुप्त रूपाने गोरक्षनाथांचा येथे वावर आहे अशी भाविकांची धारणा आहे. बाजूलाच गुरु गोरक्ष नाथांची अखंडधुनी आहे व याच स्थानावर गुरु गोरक्षनाथांनी चौऱ्याऐंशी सिध्दांना उपदेश केला व बाजूलाच नवनाथानां गुरु दत्तात्रेयांनी याच ठिकाणी गुरुमंत्र दिला होता.







२,६०० पायऱ्यावर आसपास राणक देवीमातेची शिळ आहे. थोडे अजून पुढे गेल्यावर सुमारे ३,५०० पायऱ्यांपाशी प्रसूतीबाई देवीचे स्थान आहे. संतान प्राप्ती झाल्यावर येथे त्या संतानाला घेऊन दर्शनाला येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी आहे. येथून थोडे पुढे गेल्यावर दत्त गुंफा, संतोषी माता, काली माता, वरूडी माता, खोडीयार माता अशी छोटी छोटी मंदिरे आहेत. सुरवातीला उल्लेख केलेली खालून

दिसणारी छोटी मंदिरे हीच आहेत. थोडे १००-२०० पायऱ्या चालून गेल्यावर डाव्या बाजूला जैन मंदिर येते.





हे मुख्य मंदिर २२वे जैन तीर्थंकर नेमिनाथचे आहे. प्राचीन राजवाड्यामध्येच हे जैन मंदिर आहे. काळ्या पाषाणामधील अतिशय सुंदर सुबक मोहक अशी नेमिनाथांची मूर्ती आहे. नेमिनाथ याच ठिकाणी सातशे वर्षे साधना करीत होते अन् हेच त्यांचे समाधिस्थान आहे. मंदिर सकाळी ७ वा. उघडते म्हणून येताना नक्की दर्शन घेऊ असे ठरवून आम्ही पुढे झालो. जरा थकवा जाणवला कि आम्ही थोड बसायचो. बसल्यावर आकाशी पाहीलं कि आकाशभर चांदणं रेंगाळताना दिसायचं, यात कोजागिरीचा चंद्र हातभरच लांब आहे, असा भास  व्हायचा. मला तर दूर्बिणीतूनही चंद्र इतक्या जवळ आणि स्पष्ट कधीच दिसला नाही. श्री जोर्वेकर संपूर्ण गिरनार चढताना उतरताना माझ्यासोबतच होते. ते मला माझं वय या सगळयांपेक्षा कमी आल्यामुळे सतत म्हणायचे, " बाळा, तू आमचं स्फूर्ती स्थान आहेस". माझ्या मनात विरोधाभास होता कि माझ्या पेक्षा हे तिघेही वयाने मोठे असून प्रबळ

इच्छाशक्ती, नामसाधना या जोरावर हि यात्रा करतायत, तर उलट मीच कुठेही कमी पडू नये. खरंतर मी त्यांचे नाही तर ते तिघे माझं स्फूर्ती स्थान आहेत.



गौ-मुखी गंगेच्या उजव्या बाजूने पर्वत चढायला लागल्यावर ४,८०० पायऱ्यावर अंबाजी मंदिर येते, हेच ते पार्वती मातेने आंबा मातेचे रूप घेऊन पर्वतावर वास्तव्य केले ते ठिकाण. मंदिर फार रमणीय आहे, पण उघडणायची वेळ पुन्हा ७ वा. हे स्थान बहुतेक भाविकांचे आकर्षण आहे. अनेक सुवासिनी येथे देवीची ओटी भरायला येतात. मंदिर बंद असले तरी उंबरठ्यावर ओटी ठेवतात. मातेच्या शक्तीची प्रचिती मंदिरात आल्याशिवाय राहात नाही असं म्हणतात. मातेच्या दर्शनानंतर

पुढील प्रवास सुसह्य होतो याचा प्रत्यय येथे प्रत्येकाला येतोच येतो. पहिला पर्वत आणि पहिला टप्पा इथेच संपतो. इथून पुढे सरळ समोर दुसऱ्या डोंगरावर ५,५०० पायऱ्यांवर श्री गोरखनाथ मंदिर हे स्थान दिसते.



मंदिर तसे छोटेच आहे ८ X १० चौ.फूट असेल. आम्ही दर्शन घेतले. एका सद्गृहस्थाने हातावर खडी साखरेचा प्रसाद ठेवला. इकडे विभूती देतात , मंदिरा समोरच एक महाराज विभूती वाटप करत होते. विभूतीसाठी बरीच गर्दी होती, म्हणून आम्ही घेतली नाही. हे गिरनार पर्वतवरील शिखरांपैकी सर्वांत उंच स्थान आहे. समुद्र सपाटीपासून ३,६६६ फुटावर हे स्थान येते. दुसरा पर्वत आणि दुसरा टप्पा इथेच संपतो. इथून पुढे सरळ गुरुशिखर दिसते. एका सुळक्यावर हे निळसर

रंगाचे छोटेखानी मंदिर आहे. १,५०० पायऱ्या खाली उतरून पुन्हा हा तिसरा डोंगर चढवा लागतो.

भगवान दत्तात्रेयाची सगुण उपासना करताना चरण पादुकांची उपासना सर्वश्रेष्ठ मानली जाते. तसेच आकाशातील चांदण्याचे अवलोकन करणे हाही काही साधकांचा दत्त उपासनेचाच भाग असल्यामुळे या स्थानावरून पहाटेच्या अथवा रात्रीच्या वेळी अवकाशाचे विहंगम दृश्य दिसते. ते येथे येऊनच अनुभवावे. पावसाळ्यात तर येथील अनुभवाचे शब्दात वर्णन करणेच अशक्य आहे. ढगसुध्दा शिखरापासून खाली असतात. माणसाचे मन हे दुर्गुणांचे माहेरघर असून या ठिकाणी जाण्यासाठी १०,००० पाय-या चढून जाव्या लागतात. प्रत्येक पायरीवर एक एक दुर्गुणाचा त्याग करीत चढायचे असते. शेवटच्या पायरीवर त्यागाचाही त्याग करायचा आहे. काम, क्रोध, मोह, माया, पाश हे एवढेच दुर्गुण नाहीत. तर त्यांच्या अनेक शाखा, उपशाखा, पोटशाखाही आहेत. त्या आपल्या जन्मापासूनच आपल्या मनाच्या गाभाऱ्यात खोलवर रुजल्या आहेत. नकळत जोपासल्या गेल्या आहेत. प्रत्येक पायरी चढताना त्या समूळ नाहीशा होतील आणि प्रत्यक्ष श्रीदत्त भेटतील अशी प्रत्येक भक्ताला आशा आहे. अनेकांना याचा लाभ झाला आहे, तो आपल्यलाही व्हावा हा या यात्रेमागचा खरा उद्धेश आहे.

थोडे अंतर पुढे खाली उतरल्यावर दोन मोठ्या सोनेरी कमानी लागतात. एक उजव्या बाजूच्या कमानीतून सुमारे ३०० पायऱ्या उतरल्यावर श्री कमंडलू स्थान आहे. आम्ही प्रथम श्री दत्तांच्या चरणकमलांचे दर्शन घेऊ असे ठरवून चढू लागलो.






डाव्या बाजूच्या कमानीतून पुढे समोर १,००० पायऱ्या चढल्यावर गुरूशिखर हे उभ्या सुळक्यासारखे सरळ उभे आहे. श्रीदत्तगुरुंच्या चरणपादुका उमटलेल्या या शिखरावर चढताना थंडी, वारा, पाऊस या प्रत्येक ऋतूचा अनुभव वेगळाच असतो. आम्हाला भरपूर थंडी जाणवली. सोसाट्याचा वारा सुटला होता. मी कानटोपी आणि इतरानी उबदार झिपर (स्वेटर) घातले होते. याच स्थानावर बसून भगवान श्रीदत्तात्रेयांनी १२,००० वर्षे तपश्चर्या केली आणि म्हणूनच हे त्यांचे अक्षय निवासस्थान आहे अशी श्रद्धा सर्व दत्तभक्तांमध्ये आहे. १० X १२ चौ.फूट जागेमध्ये भगवान श्री दत्तात्रेयांच्या काळ्या पाषाणातील विलोभनीय पादुका, एक सुबक मूर्ती

त्या शेजारी एक पुजारी बसू शकेल एवढी जागा आहे.बाजूलाच प्राचीन गणेश अन् हनुमानाची मूर्ती आपलं लक्ष वेधून घेते. चरणकमलाच्या मागे थोड्या खाली एक प्राचीन शिवलिंग आहे. आम्हाला गुरूशिखरापर्यंत पोहोचायला आणि दर्शन घ्यायला तीन वाजले. ही सर्व साधारणा ब्रम्ह मुहूर्ताची वेळ. दर्शन खूपच सुंदर झाले. मन श्रद्धा आणि भक्तीने भरुन आले. गर्दी असल्यामुळे आणि जागे अभावी फार वेळ मंदिरात उभं राहू देत नाहीत. जे कोण महाराज आहेत ते "पुढे चला सगळयांना दर्शन घेऊ द्या" अशी सूचना सतत करत असतात.

उतरताना परत त्या दोन सोनेरी कमानीशी आल्यावर कमंडलू स्थानाकडे जायला ३०० पायऱ्या उतरायला लागतात. या कमानी पाशी उभं राहून गुरु गोरखनाथ शिखर पहिले असता शिखरा शेजारी मोठा नंदीचा आकार दिसतो. त्यानं शिखरावरच्या विविध दगडांनी मिळून हा आकार तयार होतो. एका विशिष्ट कोनातूनच पहिले असता हा आकार स्पष्ट दिसतो. त्या आकारापाठी पौर्णिमेचा चंद्र आल्यामुळे तो नंदी खुलून दिसतो, साक्षात खरा वाटतो. आम्ही फोटो काढायचा प्रयत्न केला पण अपुरा प्रकाश आणि खूप अंतर असल्यामुळे नीटसा आला नाही. पण नंदी दर्शन हा प्रकार खूप विलक्षण आणि विलोभनीय आहे. कमंडलू तीर्थापाशी खाली उतरून आलो. तीर्थ शांत, प्रसन्न आहे.

इथे ५,००० वर्षांपासून असलेली अखंड धुनी आहे. ही धुनी एक दैवदुर्लभ देणगी आहे. आजही ती धुनी दर सोमवारी सकाळी सुमारे ६.००-६.३० वाजता तासाभरासाठी प्रकट होते असं म्हणतात. त्या अग्नीरुपानं साक्षात् श्रीदत्तप्रभूच तिथे प्रकटतात.  या अनुपम दर्शनाचा लाभ घ्यायचा असल्यास सोमवारी पहाटे (म्हणजेच रविवारी मध्यरात्री) २.००-२.३०च्या दरम्यानच पर्वतारोहणास आरंभ करावा लागतो.येथील भस्म प्रसाद म्हणून भाविकांना दिले जाते. कमंडलुकुंड स्थानी असलेले साधू सुमारे ५-६ मण काष्ठं पिंपळाची लाकडे समर्पित करतात (आपण होळीला जशी लाकडं उभी रचतो तशी अग्नीकुंडात रचून ठेवतात.) आणि एका विशिष्ट क्षणी आपल्या डोळयांचं पातं लवण्याच्या आतंच् श्रीदत्तात्रेय निर्मित स्वयंभू अग्नीनारायणाची १२ फूट उंचीची ज्वाला प्रकटते. श्रध्दावान भक्तांस त्यामध्ये साक्षात् दत्तप्रभूंचे दर्शन होते. रविवार असल्याने या धुंनीचे साक्षीदार काही होता आले नाही, पण हि जागा एकूणच दिव्य आहे.

अशी अख्यायिका आहे कि, भगवान दत्तात्रेय ध्यानात हजारो वर्षे गिरनार पर्वतावर बसले असताना प्रजा दुष्काळाने हैराण झाली होती. प्रजेची दया येऊन देवी अनुसूया मातेने ध्यानावस्थेतून बाहेर काढण्यासाठी दत्तांना हाक मारली. तेव्हा भगवान दत्तात्रेयांचे कमंडलू खाली पडले. एक भाग एकीकडे व दुसरा भाग दुसरीकडे असे त्याचे विभाजन झाले. एक ठिकाणी अग्नी (जिथे धुनी आहे) प्रकटला तर दुसऱ्या स्थानावर गंगा अवतरुन जलकुंड निर्माण झाले तेच हे कमंडलू स्थान आहे. येथील आश्रमामध्ये अन्नछत्रही आहे. आजही हे अन्नछत्र २४ तास सेवेत असते. सेवा देणारे सेवेकरी अगदी आग्रहाने प्रसाद देत असतात. आम्ही याच अन्नछत्रात गाठीया

जिलबीचा प्रसाद घेतला. इतक्या पायी प्रवासानंतर पोटासाठी हा आश्रमच खरा आधार आहे. अन्न-पाण्याची सोय इथे विनामूल्य होते. थोडाफार बसून आरामही करता येतो. सगळीकडे गुरु दत्तात्रयांचा वास भरून राहिला आहे. एकूणच भारावलेले वातावरण आहे. मनाला सतत काहीतरी दिव्य सोबत आल्याची जाणीव होते. अंतःकरण हे  दत्त नामाने भरून जाते आणि इथूनच परतीचा प्रवास सुरु होतो. जाण्यासाठी आणि येण्यासाठी एकाच मार्ग आहे. ज्या पायऱ्या आपण चढून आलो त्याच आता उतरायच्या आहेत.

आम्ही परतीचा प्रवास सुरु केला आणि पुन्हा गुरु गोरखनाथ मंदिरा जवळ आलो. सकाळचे ४ वाजले असतील. मंदिरापुढे एक छप्पर असलेली छोटी आरामासाठी जागा आहे. चालून चालून पायांनी हात वर केले होते. सगळेच खूपच दामले असल्याने सगळ्यांनी अंग टाकले. थंडी खूप जाणवत होती. डोळे कधी मिटले कळलेचं नाही.  आम्ही सगळे एक तासाभराने उठलो. एकदम ताजे तवाने होऊन उतरायला लागलो. आता चांगलेच उजाडले होते. केशरी तांबूस सूर्य नारायणाचे दर्शन झाले. पौणिमेचा विरत जाणारा चंद्र आणि उगवणारा सूर्य हा योग खूप क्वचितच पाहायला मिळतो. गिरनारच्या बाजूला नजर टाकली की भव्य दातार पर्वत दिसतो. आजूबाजूला गिरनार अभयारण्य आहे. वरून पहिले असता हि हिरवळ डोळयांना खूप आल्हाददाई वाटते. छाती भरून श्वास घेतला, पायाला वेग दिला तोवर अंबाजी मंदिर आले. अंबाजी मातेचं मंदिर उघडायला आजूनही अवकाश होता. आम्ही खाली उतरण्याचा निर्णय घेतला. मी पटकन मंदिराच्या पायऱ्या चढून उंबरठ्यावर डोकं टेकून नमस्कार करुन आलो. पुढल्या वेळेस नक्की दार उघड आई म्हणून प्रार्थनाही

केली. अंबाजी मंदिराच्या पर्वतावरून खाली सगळी जैन मंदिरे स्पष्ट दिसतात. नेमिनाथ मंदिराचा परिसर खूप मोठा आणि प्रशस्थ दिसतो. प्रत्येक मंदिरावर केलेलं नक्षीकाम विलोभनीय आहे. उतरून खाली येताना नेमिनाथ मंदिर प्रवेशद्वार दिसले.



सकाळचे सात वाजून गेले असतील म्हणून मंदिर उघडले होते. मंदिर परिसर खूपच प्रशस्थ आहे आणि प्रत्येक खांब, घुमटावर बारीक, अप्रतिम कोरीव काम केलेले आहे. बघणाऱ्याला हे कलाविश्व थक्क करणारे आहे. " एवढ्या उंचीवर एवढे मोठे मंदिर कसे बनवले असेल ?" हा एकच विचार माझ्या मनात रुंजी घालत होता. बांधणाऱ्यालाही मनोमन नमस्कार केला. सामान आणि काठी दरवाजा जवळ ठेवून गाभाऱ्यात दर्शनासाठी गेलो. गाभाऱ्यात अंधार होता. आपण दिवाळीला काचेच्या

ग्लासात पाण्यावर तेल ओतून जे दिवे उजळवतो, तशा अनेक मिणमिणत्या दिव्यांनी गाभारा उजळला होता. अगदी तिरुपती सारखंच त्या दिव्यांच्या मंद प्रकाशात नेमिनाथ महाराजांचे दर्शन झाले. काळया पाशाणातील अतिशय सुबक मूर्ती, नक्षीदार सुवर्ण मुकूट, चांदिचे डोळे आणि चेहर्‍यावर स्मित हास्य. दोन मिनिटे आपला आपल्या नजरेवर विश्वास बसणार नाही एवढे सुंदर सगुण रुप. मी तर काळया पाशाणातील अशी मूर्ती प्रथमच पाहीली, मुंबईत पाहिल्या आहेत त्या सगळया मुर्त्या संगमरवरी, पाढ-या शुभ्र आहेत.

पुन्हा अजून उतरताना प्रसूतीबाई देवी, दत्त गुंफा, संतोषी माता, काली माता, वरूडी माता, खोडीयार माता ही छोटी मंदिरे लागली.आता सूर्य प्रकाशात सगळया मुर्त्या सुंदर दिसत होत्या. दर्शन घेऊन उतरायला लागलो. उतरायला तसा जरा कमीच वेळ लागतो. पायांना एकदा वेग आला, दम लागला की थांबायचं असं ठरवून भर भर उतरलो. शेजारीच ५०० पायर्‍यांची खूण दिसली. १५-२० मिनटात खाली पोहचू असं श्री. जोर्वेकरांना सांगितलं तसं त्यांच्याही चेहर्‍यावर समाधान झळकलं.


उतरताना वाटेत अनेक माकडे दिसली, काळया तोंडाची. त्यांचे त्यांच्यातच खेळ सुरु होते. मस्त पायर्‍यांवर भली मोठी शेपटी पसरून सगळे ऐटीत बसले होते. मी थोडा पायरीवर काठी आपटत आपटत चालत होतो. आजूबाजूचे दूकानदार "कोणतेही खाण्याचे सामान हातात ठेऊ नका" असे बजावून सांगत होते. तस त्यांचा फारसा उपद्रव नाही, कोणत्याही यात्रेकरूला त्रास देत नाहीत.

समोर ५० पायऱ्यांवर  शेंदरी रंगाची पायथ्याची कमान दिसली.  आम्ही रात्री ९. ०० वा. चढायला सुरुवात केली होती, सकाळी ९. ०० वा.पायथ्यापाशी पोहोचलो.



उतरल्यावर मी पुन्हा एकदा पहिल्या पायरीवर थबकलो. मी मागे वळून पहिले. गिरनार सुंदरच दिसत होता. यात्रा इथे संपली होती. मन खूप शांत, प्रसन्न झाले होते. पहिल्या पायरीला पुन्हा डोकं टेकून नमस्कार केला. दत्त महाराजांनी सुखरूप सारं काही घडवून आणलं होत. महाराजांना मनोमन द्यन्यवाद दिले. "पुन्हा बोलवा मी नक्की येईन" असं मनोमनी सांगितलं.  डोळे आपसूक मिटले गेले आणि मनात एकाच गजर झाला " जय गिरनारी, जय  गिरनारी."

अशी  ही माझी पहिली गिरनार यात्रा सद्गुरू कृपेने सफळ संपूर्ण.


Dattatreya Temple

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. अनूप साळगांवकर यांचं ई साहित्यवरचं हे दुसरं पुस्तक.**

अनूपजी एक तरूण लेखक आहेत. नवीन पिढ्यांवर संस्कार व्हावेत, काहीतरी छान चांगलं निर्माण व्हावं या उद्देशाने ते लिहीतात. त्यांची भाषा रसाळ आणि प्रासादिक आहे. सहज वापरातल्या शब्दांतून ते एक सुंदर जग निर्माण करतात. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

ई साहित्य प्रतिष्ठान

प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान